**प्रेसनोट** **दिनांक २६/०७/२०१९**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे

## कोल्हापुर येथीलकुख्यात भरतत्यागी यांच्या टोळीतील खुनाच्यागुन्ह्यात शिक्षा भोगणारा पॅरोल रजेवरुन फरारकैदीजेरबंद

दि.१९/०७/२०१९ रोजी मा. वरिष्ठांनी अवैधधंदेचे समुळ उच्चाटन करणे बाबत आदेश दिल्याने विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण आव्हाड यांनी तपास पथकाचे पोउनि राहुल घुगे यांना पोलीस स्टेशऩ हद्दीत अर्वेध धंद्यावर कारवाई करणे बाबत आदेशित केले होते. त्या अनुषंगाने गस्त करीत तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी टॅंक रोड, शांतीनगर, येरवडा पुणे येथे आले असता, पोशि अनिकेत भिंगारे यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, कोल्हापुर जेल मधुन फरार कैदी नामे धैर्यशिल कांबळे हा बुध्दविहाराजवळ, शांतीनगर येथे थांबला आहे. मिळालेल्या बातमी प्रमाणे सदर ठिकाणी गेलो असता, धैर्यशिल संपतराव कांबळे यास पोलीस असल्याचा संशय आल्याने तो तेथुन पळुन जावु लागल्याने त्यांस पाठलाग करुन शिताफिने पकडण्यात आले आहे. सदर आरोपीवर खुनाचे ०४ गुन्हे दाखल असुन सदर आरोपीस पुढील कारवाई करीता कुरळप पोलीस स्टेशन, जिल्हा सागंली यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा. सुनिल फुलारी पुर्व प्रादेशिक विभाग, मा. प्रकाश अक्कानवरु पोलीसउप-आयुक्त परिमंडळ ४, मा. लक्ष्मण बोराटे सहा.पोलीस आयुक्त खडकी विभाग, मा. वपोनि अरूण आव्हाड यांचे मार्गदर्शना खाली सदरची उल्लेखनीय कामगिरी ही तपास पथकाचे अधिकारी राहुल घुगे, पोलीस कर्मचारी पोहवा विजय सावंत, यशवंत किरवे, प्रविण भालचिम, पोना किशोर दुशींग, रिहान पठाण, अनिकेत भिंगारे, प्रफुल्ल मोरे, शेखर खराडे यांनी उत्कृष्टरित्या कामगिरी पार पाडली आहे.